**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४**
webside www.sscboardkolhapur.in Chairman 2690829 , Secretary 2691405
(O) PBX - 0231-2696101, 2696102, 2696103 E-Mail: divsec.kop@ gmail.co

क्र.कोविमं/उ.मा.परीक्षा/२८४
दिनांक :२२.०१.२०१९

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा सातारा/सांगली/कोल्हापूर

विषय - दिव्यांग विद्यार्थ्यांना आरोग्य व शारिरीक शिक्षण,छात्रसेना इ.विषयात सवलत मिळणेबाबत ...

संदर्भ - १) शासन निर्णय क्र. संकीर्ण -२०१७ -/(११८/१७ ) एस.डी.६. दि.१६/१०/२०१८ चे पत्र.
२) क्रमांक/रा.मं./प्रकाशन/दिव्यांग/३४४ दि.१८/०१/२०१९ चे पत्र.

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, दिनांक १६ ऑक्टोबर २०१८ च्या शासन निर्णयामध्ये इ.१ ली ते १२ वी पर्यंतच्या विशेष गरजा असणा-या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्ययन शैलीनुसार मुल्यांकनाबाबत व शैक्षणिक सवलती संदर्भात मार्गदर्शन सुचना दिल्या आहेत.

सदर शासन निर्णयामध्ये एकूण २२ दिव्यांगाच्या प्रकारांना आरोग्य व शारिरीक शिक्षण,समाजसेवा,बालवीर वीरबाला/संरक्षण,छात्रसेना इ. विषयांचा अभ्यास जे विद्यार्थी पूर्ण करु शकत नाहीत अशा विद्यार्थ्यांना त्या विषयात सवलत देण्याबाबत उल्लेख नाही. तरी जे विद्यार्थी आरोग्य व शारिरीक शिक्षण,समाजसेवा,बालवीर/वीरबाला,संरक्षण,छात्रसेना इ.विषय पूर्ण करु शकत नाहीत अशा विद्यार्थ्यांना या विषयांमध्ये सवलत मिळण्यासाठीचा अर्ज अपंगत्व / ( दिव्यांगत्व ) /अस्थिरोग प्रमाणपत्रासह विद्यार्थ्यांचे स्वतंत्र अर्ज कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिफारशीसह प्रस्ताव सादर केल्यास वैद्यकीय प्रमाणपत्रातील दिव्यांग स्वरुप विचारात घेऊन विद्यार्थ्यांना सवलत देणेची कार्यवाही करणेत येईल. यासाठी वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे याची नोंद घ्यावी.

विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

Rao general